अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १८२ ■ शुक्रवार दि.२१ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 182 ■ Friday Dt. 21 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## पुरूषोत्तमपुरीत प्रेमप्रकरणातुन प्रेमीयुगलाने घेतले विषारी औषध

### घरच्यांचा लग्नास नकार पोलिसात एमएलसी दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**
तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथे मुलीचे आईवडील लग्नास नकार देत असल्याने प्रेमीयुगलाने विषारी औषध घेतल्याची घटना घडली असुन याप्रकरणी पोलिसात एमएलसी रिपोर्टची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान मुलीची प्रकृती बरी असुन मुलाची मात्र गंभिर आहे.
तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथील सुरज विश्वांभर मोरे व पुजा राधाकिसन सोनवणे या दोघांचे एकमेकांवर प्रेम आहे. सुरज व पुजा हे दोघे सज्ञान असुन हे प्रेमयुगल लग्न करणार होते. मुलगी सुध्दा या लग्नास तयार होती परंतु दुसरे पाहुने येणार अशी चर्चा व आम्ही सांगतोन त्या मुलाशी लग्न कर अन्यथा आम्ही आमच्या जिवाचं बरं वाईट करू अशा धमक्या आई – वडीलांकडुन मिळत असल्याने व आई – वडीलांकडुन लग्नास विरोध होत असल्याने मुलीने विषारी औषध प्राशन केले तर मुलाने देखील विषारी औषध घेवुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना नुकतीच घडली आहे. हे प्रेमयुगल सध्या मरणाशी झुंज देत असुन ग्रामीण पोलिसात एमएलसी रिपोर्टची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान दोघांवरही उपचार सुरू असुन मुलीची प्रकृती बरी असली तरी मुलाची मात्र गंभिर परिस्थिती आहे.

# बीड जिल्हा वासियांनो उघडा डोळे बघा नीट!

# दिल्लीच्या राजकारणात बारामतीच्या आशीर्वादाने मुंडे– सोनवणेंची यशस्वी फिट?

## बीडचे आजी-माजी खासदार दिल्लीच्या दरबारात एकत्र!

## खा.सोनवणे, माजी खा.मुंडे आणि खा.सुळे यांचा एकत्र फोटो चर्चेत!

## राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण; सोशल मीडियावर जोरदार चर्चा?

बीड । प्रतिनिधी
राज्याच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे आणि खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. तसेच, बीडच्या माजी खासदार प्रीतम मुंडे यांची देखील दिल्लीत भेट घेतली आहे. त्यांच्या या भेटीमुळे पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून दिल्लीत नेमकं शिजतंय काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान, एम्स रुग्णालयाच्या सेवेतील डॉक्टरांचे निवृत्ती वय ६५ आहे, तर इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीतही निवृत्तीचे वय ६५ करण्याविषयी सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत अमित शाह यांची भेट घेतली असल्याचे बोलले जात आहे.
बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे आणि बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांची देखील बीडच्या माजी खासदार प्रीतम मुंडे यांनी दिल्लीत भेट घेतली आहे. भेटीनंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला आहे. या फोटोची सध्या सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे. यामध्ये खासदार बजरंग सोनवणे व माजी खासदार प्रीतम मुंडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे या देखील आहेत. या फोटोने सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातला आहे.
एवढेच नाही तर सोशल मीडियावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया उपटत आहेत. दारात आलेल्या विरोधकांचा सन्मान करायची मुंडे साहेबांची प्रथा आजही जोपासली जाते, मतभेद असले तरी मनभेद असू नयेत, आजी–माजी खासदारांचा आदर्श घ्यावा, दबंग खासदार प्रीतम ताई मुंडे अशा प्रतिक्रिया उमटत आहेत. तर काहींनी संताप देखील व्यक्त केला आहे. इकडे कार्यकर्ते एकमेकांचे डोके फोडू लागले आणि हे सोबत फोटो काढतात, राजकीय वैर आम्ही घ्यायचे यांनी मात्र सोबत फोटो काढायचे, अशा प्रतिक्रिया उमटल्या आहेत.





### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचीही घेतली भेट

बीड मधील सरपंच हत्याकांड प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बजरंग सोनावणे यांच्या भेटीनंतर लक्ष घातले होते. त्यानंतर आता वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वयाच्या अनुषंगाने सुप्रिया सुळे आणि बजरंग सोनावणे यांनी अमित शाह यांची भेट घेतली आहे. एम्स रुग्णालयाच्या सेवेतील डॉक्टरांचे निवृत्ती वय ६५ आहे, तर इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीतही निवृत्तीचे वय ६५ करण्या विषयी या भेटीत चर्चा झाली. मात्र, तरी देखील या भेटीला राजकीय महत्त्व असल्याचे बोलले जात आहे.

## खासगी हॉस्पिटलसाठी शुल्क नियामक समिती स्थापन करा : मुळूक, गलधर

### जिल्ह्यातील रुग्णांची आर्थिक पिळवणूक थांबण्यासाठी आरोग्यमंत्र्यांना दिले निवेदन

बीड । प्रतिनिधी
गोरगरीब, वंचित व सर्वसामान्य रुग्णांसाठी शासनाने विविध आरोग्य विषयक योजना सुरु केल्या आहेत. या योजनेअंतर्गत रुग्णांवर मोफत उपचार केले जातात. मात्र बीड जिल्ह्यात आरोग्य योजना लागू असलेल्या खासगी हॉस्पिटलमध्ये रुग्णांना योजनेचा लाभ न देता त्यांना मोठ्या रकमेचे बिल भरायला भाग पाडले जाते. एवढेच नाही तर खासगी रुग्णालयात आयसीयूच्या नावाखाली रुग्णांची आर्थिक लूट केली जाते. यामुळे खासगी हॉस्पिटलवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यात शुल्क नियामक समिती स्थापन करावी, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.





जिल्ह्यात खासगी हॉस्पिटलमध्ये रुग्ण दाखल झाल्यानंतर आरोग्य योजनेचा प्रत्यक्ष लाभ न देता रुग्णांना मोठ्या रकमेचे बिल भरायला भाग पाडले जाते. योजना लागू नाही असे सांगून टाळाटाळ केल्याचे प्रकारही घडले आहेत. परिणामी आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि गोरगरीब रुग्णांवर मोठा अन्याय होत आहे. खासगी रुग्णालयांकडून रुग्णांना अवाढव्य बिल आकारले जाते. मात्र यावर कोणाचेही नियंत्रण नाही. यामुळे खासगी हॉस्पिटलमध्ये रुग्णांकडून आकारल्या जाणाऱ्या बिलावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यात शुल्क नियामक समिती स्थापन करावी. या समितीमुळे खासगी रुग्णालयांकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्काचे नियमित परीक्षण होईल. ही समिती गरजूंना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत राहील. तसेच शासनाने ज्या रुग्णालयांना आरोग्यविषयक योजनांअंतर्गत सेवा देण्याची परवानगी दिली आहे, त्यांच्यावर काटेकोर नजर ठेवावी व त्यांची तातडीने चौकशी करावी तसेच दोषी आढळणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात कोणत्याही रुग्णावर अन्याय होणार नाही असे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी म्हटले आहे.

## गावंदरा येथे जीएम पोर्टलच्या माध्यमातून अनियमितता

## पाच महिन्यात उचलले १६ लक्ष रुपये

धारूर । प्रतिनिधी
मागील काही दिवसापासून पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी यांचे दुर्लक्ष असल्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर कसल्याही प्रकारचे नियंत्रण राहिले नाही. जीईएम पोर्टलच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गावाच्या विकासासाठी आलेल्या निधीवर सरपंच आणि ग्रामसेवक जीईएम पोर्टलच्या माध्यमातून निधीवर डल्ला मारत आहेत. यातच गावंदरा येथील ग्रामपंचायत सदस्यांच्या तक्रारीनंतर या ठिकाणी पाच महिन्यात १६ लाख २० हजार रुपये रक्कम उचलल्याचे समोर आले आहे. यात मातोश्री एंटरप्रायजेच्या नावाने एकाच दिवशी पावणे अकरा लक्ष रुपये उचलल्याचेही समोर आली आहे.
मागील काही वर्षापासून पंचायत समितीमध्ये वरिष्ठांचा कसलेही प्रकारे वचक राहिला नाही. यामुळे ग्रामीण भागात १५ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून विकासासाठी आलेला निधी जीईएम पोर्टलच्या माध्यमातून बोगस पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येत आहे.



वास्तविकता जीएम पोर्टलवर खरेदी करताना क्वालिटीच्या वस्तू असतात परंतु प्रत्यक्षात जीईएम पोर्टल नियमानुसार खरेदी केली जात नाही. यातून सरपंच ग्रामसेवक हे एखाद्या एजन्सी धारकास हाताशी धरून टक्केवारीप्रमाणे कामे देऊन मोठ्या प्रमाणात या जीईएम पोर्टलच्या माध्यमातून पैशाची विल्हेवाट लावतात. यातच गावंदरा येथील ग्रामपंचायत सदस्या छाया बडे यांच्या तक्रारीवरून या गावात मोठा जीईएम पोर्टलच्या माध्यमातून अनागोंदी कारभार झाल्याचे समोर आले आहे. या ठिकाणी पंधराव्या वित्त आयोगातील मिळालेली निधी मातोश्री एंटरप्रायजेसच्या माध्यमातून एकाच दिवशी १० लाख ८५ हजार रुपयाचा निधी उचलला आहे तर राज एन्टरप्रायजेस अँड. सोलर पावर एजन्सीच्या नावाने ३ लाख ८२ हजार रकमेचा निधी उचलला आहे. यातून करण्यात आलेल्या कामाचा दर्जा तर अगदी निकृष्ट असून ५० टक्के सुद्धा निधी या ठिकाणी खर्च करण्यात आलेला नाही. निधीची विल्हेवाट लावण्यास सरपंचा प्रमाणेच ग्रामसेवक पाठक ही कारणीभूत आहेत. कामे मात्र थातूरमातूर करून दस्तऐवज मात्र नियमानुसार बनवली जातात. जीईएम पोर्टलच्या माध्यमातून खरेदी करणारे साहित्य अगदी निकृष्ट दर्जाचे असते. निधीच्या ३० टक्के ही रक्कम यावर खर्च केली जात नसल्याच्या समोर बाबी येत आहेत. मातोश्री इंटरप्राईजेस व राज इंटरप्राईजेस या एजन्सीने निधी उचलून काय कामे केली याची चौकशी काय होते याकडे आता गावंदरा ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### कोठ्यावधीचा भ्रष्टाचार

मागील दोन ते तीन वर्षाच्या कालावधीमध्ये धारूर पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत समितीकडे आलेल्या पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीच्या माध्यमातून कोट्यावधीचा निधी खर्च करण्यात आलेला आहे. जीईएम पोर्टलवरून खरेदी करताना ती ऑनलाईन खरेदी होणं गरजेचे असते. मात्र प्रत्यक्षात ती होत नाही. याबाबत वरिष्ठांनी प्रत्यक्षात चौकशी केल्यास यातून मोठा भ्रष्टाचार समोर येणार असल्याचे बोलले जात आहे.

### नोंदणी क्वालिटीची

जीईएम पोर्टलवर ग्रामपंचायत मार्फत खरेदी करताना क्वालिटीची नोंदणी केली आहे. मात्र खरेदी ही प्रत्यक्षात जीईएम प्रमाणे कसल्याही प्रकारे होताना दिसत नसून ती बाजारातून थातूरमातूर क्वालिटीचे साहित्य खरेदी केले आहे. खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा हा निकृष्ट आहे. जीईएम पोर्टल वरील प्रत्यक्षात खरेदी झाल्यावर गावात विकासाची चांगली कामे होतात. परंतु तसे प्रत्यक्षात कुठेच होताना दिसत नाही ग्रामपंचायत कडून मासिक सभा घेण्यात येत नाहीत.

– छाया बडे, ग्रामपंचायत सदस्य गावंदरा

# देवपिंपरी येथे जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे!

■ भीषण पाणी टंचाई; हंडाभर पाण्यासाठी गावकऱ्यांची वनवन ■ संबंधित ठेकेदाराने मनमानी कारभार करत केले बोगस कामे?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची अनेक कामे सुरू आहेत. ही कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचा आरोप अनेक गावांमधील नागरिकांकडून होत आहे. तसेच जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामांत गैरव्यवहार झाला असल्याची खंत आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत आवाज उठवला आहे. आणि तसे तालुक्यातील देवपिंपरी ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन पाणीपुरवठा योजनेच्या कामे हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे सरपंच नंदा शिवाजी गवारे यांच्याकडून सांगण्यात येत आहे. याप्रकरणी त्यांनी पाणीपुरवठा अभियंता यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार देखील केली आहे. पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अशी, मागणी होत आहे.

## पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी?

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील देवपिंपरी ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम केले आहे. ज्यामध्ये विहीर, पाइपलाइन, गावाअंतर्गत नळाद्वारे पाणीपुरवठा करणे, जुन्या विहिरीचे खोलीकरण करणे, नव्या विहिरीमध्ये व जुन्या विहिरीमध्ये आडवे बोर घेणे, तसेच नवीन विहिरीमध्ये मोटार पंप बसवणे असे इत्यादी कामे करणे आवश्यक होते. परंतु संबंधित ठेकेदाराने मनमानी कारभार करत हे सगळे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे केले आहे. शिवाय संबंधित ठेकेदाराने खोदलेल्या विहिरीला पाणी न लागल्याने गावात पाणीपुरवठा होत नाही. यामुळे गावकऱ्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

देवपिंपरी येथे पाणीटंचाई गंभीर असल्याने गावाला ट्रॅकरने पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. तसेच जलजीवन पाणीपुरवठा योजनेच्या अंतर्गत झालेल्या सर्वच कामाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई होणे गरजेचे आहे. यावेळी प्रत्यक्ष पाण्याची गरज आणि आवश्यक असणार्या बाबीकडे डोळे झाक करण्यात आली. प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर कोणालाही योजनेची माहिती न देता कामाचा सपाटा लावला. नागरिकांतून तक्रारी होऊ लागल्या. यामुळे बर्याच गावांत ठेकेदारावर कारवाई करावी या योजनेच्या निधीचे इस्टिमेट, प्रत्यक्ष झालेले काम आणि गुणवत्ता यांची तपासणी जिल्हा परिषद सिओ यांनी स्वतःच करायला हवी काही ठिकाणी निकृष्ट कामे झाल्याचे उघडकीस आले आहे.

जलजीवनच्या कामावर प्रकाश टाकला. यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागले. त्यामुळे जागरूक झालेल्या नागरिकांनी व गावांतील लोक या कामावर सतत लक्ष ठेवून आहेत.अधिकार्यांचे व ठेकेदारांचे संगनमत उघड झाले असून, निधीचा गैरवापर होत असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र-संताप आहे. या योजनेचे काम अतिशय पारदर्शक व निर्दोष पद्धतीने व्हावे, यासाठी गाव पातळीवर नागरिकांसह गावचे लोकप्रतिनिधी सरपंच नंदा गवारे यांनी पुढाकार घेतला असून, या प्रकरणावर जिल्हा प्रशासनानेही तात्काळ लक्ष द्यावे, तातडीने कारवाई करावी अशी मागणी सरपंच नंदा शिवाजी गवारे यांनी केली आहे.



# खडी क्रेशरचा व्याप आणि डोक्याला ताप..!

## खडीक्रेशरची वाढती संख्या हा किल्लेधारूर परिसरातील चिंतेचा विषय

किल्लेधारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर परिसरातील खडीक्रेशरची वाढती संख्या आणि पर्यावरणाचे होणारे नुकसान सध्या कळीचा मुद्दा बनला असून यावर महसूल खात्याने उपाय योजना करावी अशी मागणी परिसरातील जनतेतून होत आहे. किल्लेधारुर परिसरातील डोंगर भागात खडीक्रेशर टाकायचे व अमाप पैसा कमवायचा हा उद्देश ठेवुन खडीक्रेशरची संख्या वाढत असून त्याला महसूल व महावितरणची अर्थपूर्ण साथ लाभत असल्याचे दिसून येत आहे. या क्रेशरमुळे शेकडो शेतकऱ्यांची जमीन नापिक होत असून त्यांना श्वशनाचे त्रास ही होत आहेत. उडणारी धुळ चार पाच किलोमिटर पर्यंत जात असल्यामुळे त्या शिवारातील जमिन हळुहळु नापिक होत चालली असून शेतकरी हवालदील झाला आहे.

क्रेशर वाल्यांचे अधिकारी यांच्याशी लागे बांधे असल्यामुळे दाद मागायची कुणाकडे हा प्रश्न परिसरातील नागरीकांना पडला आहे. डोंगर भागातील क्रेशर मुळे झाडे, वन्यजिव, नैसर्गिक संपत्ती चा विनाश होत असल्यामुळे प्राण्यांना पिण्याचे पाणीसुध्दा या धुळीने प्रभावीत होत आहे. धुळीवर उपाययोजना करणे खडीक्रेशर मालकाचे काम असताना ते मात्र या बाबतीत हात वर करत आहेत. रस्त्याच्या कडेला असलेल्या खडीक्रेशर मुळे वाहन चालकाच्या धुळ डोळ्यात जाउन तसेच धुळीमुळे पुढील वाहन न दिसल्याने अनेक अपघात झाले आहेत.

यावर महसुल विभागाने जातिने लक्ष देऊन खडीक्रेशर मालकांना नियमाचे पालन करायला लावणे आवश्यक असल्याचे बोलले जात आहे. वाहतूक करणारे हायवा, टिप्पर, इ. वाहने इको, खडीची, वाहतुक करताना त्यावर पाणी मारुन अथवा त्यावर झाकून वाहतूक न करता तशीच केली जाते त्यातील धुळीमुळे शहरातील हवेतील प्रदुषणात वाढ होत आहे.

टिप्पर मुळे एकही रस्ता व्यवस्थित राहीलेला नसून यांच्या वेगामुळे अनेक दुचाकी स्वार अपघात ग्रस्त झालेले पाहवयाला मिळत आहेत. नविन खडीक्रेशरला परवाने न देता जे सध्या कार्यरत आहेत त्यांना नियमाचे पालन करायला लावून पर्यावरण व नैसर्गिक संपत्तीचे मा. तहसीलदार साहेबांनी रक्षण करावे अशी मागणी किल्लेधारुर परिसरातील शेतकरी, वन्य व पर्यावरण प्रेमी जनतेतून होत आहे. यावर वेळीच उपाय योजना केली नाही तर हजरो एकर जमीन यामुळे नापिक झालेली दिसुन येईल असे जाणकार आपले मत व्यक्त करत आहेत.



# ...अखेर यावर्षीच्या संचमान्यता मुख्याध्यापक लॉगीनला जनरेट झाल्या

## राज्य कृती समितीच्या खंडेराव जगदाळे सरांच्या प्रयत्नांना यश

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ हे वर्ष संपत आले तरी संच मान्यता जनरेट झाल्या नव्हत्या. त्यामुळे महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने मागील महिनाभरापासून राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे सर यांनी शिक्षण संचालक यांच्याकडे संचमान्यता जनरेट करण्याबाबत तोंडी आणि लेखी निवेदनाद्वारे पाठपुरावा केला होता. या विषयी १७ मार्च रोजी खंडेराव जगदाळे सर यांनी संचालक यांना निवेदन देऊन ३१ मार्चपर्यंत संच मान्यता जनरेट करा अन्यथा ०१ एप्रिल पासून शिक्षण संचालकाच्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत शिक्षण संचालकांनी काल २० मार्च रोजी मुख्याध्यापक लॉगिनला शैक्षणिक वर्ष २०२४ २५ च्या संच मान्यता जनरेट केल्या. काल २० मार्च रोजी रात्री मुख्याध्यापक यांच्या लॉगिनला संच मान्यता जनरेट होताच शिक्षण संचालक आणि कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे सर यांचे मुख्याध्यापक वर्गाकडून आभार मानले जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षातील संच मान्यता शैक्षणिक वर्ष संपत आले तरीही जनरेट झाल्या नव्हत्या. या संदर्भात महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने संघटनेचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे सर यांनी मागील महिनाभरापासून शिक्षण संचालक यांच्याकडे संच मान्यता जनरेट करण्यासाठी पाठपुरावा केला होता. शिक्षण उपसंचालक यांच्याकडे वारंवार तोंडी आणि लेखी निवेदनाद्वारे ही मागणी लावून धरली होती. १७ मार्च रोजी शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी शिक्षण संचालकांची भेट घेऊन लेखी निवेदन दिले होते. तसेच संबंधित खात्याच्या मंत्र्यांनाकडे ही याबाबत विविध माध्यमांतून त्यांचा पाठपुरावा सुरूच ठेवला होता. दरम्यान जगदाळे सरांनी शिक्षण संचालक यांची भेट घेऊन ३१ मार्चपूर्वी संच मान्यता जनरेट



करावयात अन्यथा ०१ एप्रिल पासून आपल्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला होता. अखेर खंडेराव जगदाळे सर यांच्या प्रयत्नाला यश आले. जगदाळे सरांच्या तीव्र आंदोलनाच्या इशाऱ्याची शिक्षण संचालकांनी गांभीर्याने दखल घेत काल २० मार्च रोजी माध्यमिक शाळांच्या संचमान्यता मुख्याध्यापकांच्या लॉगीनला उपलब्ध करून दिल्या.

माध्यमिक शाळांच्या संचमान्यता मुख्याध्यापकांच्या लॉगीनला जनरेट होताच राज्यातील अंशतः अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील कार्यरत ७५००० कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. संघटनेचे उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे सर यांच्या प्रयत्नांना व पाठपुराव्यास मिळालेल्या या अद्वितीय यशाबद्दल शिक्षण संचालक आणि महाराष्ट्र राज्य व संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा संघर्षयोद्धा खंडेराव जगदाळे यांचे महाराष्ट्र राज्य कृती समिती बीडच्या वतीने जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांच्यासह मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे निरीक्षक विजयसिंह शिंदे महिला संघटनेच्या महिला आघाडीच्या मराठवाडा संघटक मुक्ता मोटे, दैवशाला मुंडे, सुरेखा गायकवाड मॅडम, मरकेमॅडम, जिल्ह्याचे पदाधिकारी सौंदलकर, शेख, जिल्हा उपाध्यक्ष रामदास जामकर, पंकज कळसकर, बीड तालुकाध्यक्ष भागवत यादव, वडवणी तालुका अध्यक्ष वैजिनाथ शिंदे, गेवराई तालुका अध्यक्ष दीपक गरूड, आष्टी तालुका अध्यक्ष रविंद्र भुकन, पठाण, मोरे, गवळी, बाळासाहेब नागरगोजे, प्रताप देशमुख, श्रीराम जाधव, गोविंद आघाव, भालके, सुरेश कदम, जावेद पठाण, मुंडे यांच्यासह आदींनी आभार मानले.

# लाचखोरीला कंटाळून सरपंच पतीचा केज पंचायत समितीत आत्मदहन करण्याचा प्रयत्न

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील घनकचरा व्यवस्थापन, सांडपाण्याचे शोषखड्डे व सार्वजनिक शौचालय बांधकाम या कामांची मोजमाप पुस्तिकेत नोंद घेऊन बिल काढण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी महिला सरपंचाकडे ५० हजार रुपयेची मागणी केली. त्या पैकी त्यांना २० हजार रु. देऊनही ३० हजार रु. न दिल्यामुळे त्यांनी बिल काढले नसल्याने व्यथित होऊन संतप्त झालेल्या सरपंच पतीने केज पंचायत समितीमध्ये आत्मदहनाचा प्रयत्न केला. केज तालुक्यातील डोका येथील महिला सरपंच कमल गोरख भांगे यांनी गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी नियोजन यासाठी आणि सार्वजनिक शौचालय याची कामे केलेली आहेत. सर्व कामे पूर्ण होऊन देखील त्याची मोजमाप पुस्तिकेत नोंद घेऊन त्यांच्या बिलासाठी त्यांनी वारंवार ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे कागद- पत्रांनिशी मागणी केली. परंतु ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता आंधळे, कनिष्ठ अभियंता चव्हाण आणि शाखा अभियंता वंदना साळवे या दोघांनी सरपंच पती गोरख भांगे यांच्याकडे ५० हजार रु. ची मागणी केली.



गोरख भांगे यांनी कार्यकारी अभियंता आंधळे यांना त्यापैकी २० हजार रुपये त्यांना नगदी दिले. मात्र अद्यापही त्यांचे बिल निघाले नाही. त्या बाबत त्यांनी चौकशी केली असता उर्वरित ३० हजार रुपये जो पर्यंत देणार नाहीत; तो पर्यंत मोजमाप पुस्तिकेत नोंदी घेऊन बिल मिळणार नाही. अशी अरेरावीची व मग्रुरीची भाषा कनिष्ठ अभियंता चव्हाण आणि शाखा अभियंता साळवे यांनी सरपंच पती गोरख भांगे यांना वापरली. तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली. त्यामुळे संतप्त झालेल्या सरपंच पती गोरख भांगे यांनी दि. २० मार्च रोजी दुपारी ४:०० वा. च्या सुमारास केज पंचायत समितीच्या इमारतीमध्ये आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र आरडाओरड आणि आत्मदहनाची माहिती मिळताच प्रभारी गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने काळे यांनी केज पोलिसांना फोन करून त्यांना पाचारण केले. पोलीस उपनिरीक्षक शैलेश जोगदंड आणि त्यांचे पोलीस नाईक शिवाजी कागदे यांनी सरपंच पती गोरख भांगे यांच्या हातातील काडेपेटी खेचून घेत त्यांना आत्मदहन करण्या पासून रोखले.

# संतप्त महिलेने पोलीस ठाण्यासमोरच अंगावर ओतुन घेतले डिझेल

केज । प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून पळवुन नेल्याची घटना घडून जवळपास दीड महिना झाला तरी युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊनही अद्याप मुलीचा शोध लागत नाही नातेवाईकांनी पोलिसांकडे विचारपूस केल्यास प्रत्येक वेळी वेगवेगळी उडवा उडवीचे उत्तर देत हे प्रकरण मिटविण्यास सांगत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केल्यानंतर पीडित मुलीच्या आईने युसुफ वडगाव पोलीस ठाण्यासमोर येऊन अंगावर डिझेल ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याची घटना दि.२० मार्च २०२५ गुरुवार रोजी दुपारी युसुफ सुवडगाव पोलीस ठाण्या समोर घडली. सदरील महिला पोलीस ठाण्याच्या दिशेने धावत आली आणि अंगावर डिझेल ओतून घेतले. त्यामुळे उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यांनी तिला रोखल्याने पुढील अनर्थ टळला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT